कृष्णा एक्सप्रेस
www.krishnaexpress.in
23 Aug 2025 - Page 2

# रयत शुगर फॅक्टरी येथे सायबर जनजागृती सत्र



कराड – वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर जनजागृती घडवून आणण्यासाठी रयत शुगर फॅक्टरी, शेवाळेवाडी येथे सायबर जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. क्विक हील फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत आणि सायबर शक्ती क्लबच्या सहकार्याने हे सत्र पार पडले. फॅक्टरीचे युनिट हेड श्री. आर. जे. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड यांच्या प्रोत्साहनातून विद्यार्थिनी सायली ज्ञानदेव यादव व ऋतुजा विजय कोरडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी ऑनलाईन सुरक्षितता, पासवर्ड व्यवस्थापन, सोशल मीडियावरील धोके, फिशिंग, ओटीपी फसवणूक, खोट्या लिंक, डीपफेक व्हिडिओ, आयडेंटिटी थेफ्ट अशा वाढत्या सायबर धोका प्रकारांची उदाहरणांसह माहिती दिली.

उपस्थितांना सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारण्याचे आवाहन करताना तज्ज्ञांनी प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित उदाहरणे मांडली. सहभागींच्या प्रश्नांना उत्तरे देत सायबर सुरक्षेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

प्राचार्य डॉ. एस. जे. वाघ यांनी विशेष सहकार्य केले. सत्रानंतर उपस्थितांनी समाधान व्यक्त करत अशा उपक्रमांची पुनरावृत्ती व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. सायबर फसवणुकीबाबत सजगता निर्माण करण्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. उपस्थितांनी उत्साहाने सहभाग घेत उपयुक्त माहिती आत्मसात केली.